# शिवाजी विद्यापीठ ओस

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सरकारी कार्यालयात रोटेशन पद्धतीचा अवलंब करण्याचे आदेश दिले आहेत. याची अंमलबजावणी शुक्रवारपासून शिवाजी विद्यापीठामध्ये सुरु करण्यात आली. विद्यापीठाच्या प्रत्येक अधिविभागाप्रमुखांनी याचे नियोजन केले आहे. विद्यापीठामध्ये अधिकारी, कर्मचारी विद्यार्थी, नसल्याने विद्यापीठाचा परिसर ओस पडला आहे.

कोरोनाचा फैलाव टाळण्यासाठी सरकारने शाळा, महाविद्यालये बंद ठेवली आहेत. याच पार्श्वभूमीवर सरकारी कार्यालयात गर्दी होऊ नये यासाठी कार्यालयांनाही सुटी दिली आहे. मात्र सरकारी कर्मचाऱ्यांना हजर राहण्याचे आदेश दिले होते. सरकारी कर्मचाऱ्यांना रोटेशनुसार काम देण्याचे आदेश राज्य सरकारने बुधवारी निर्गमीत केले. यानुसार ५० टक्केच कर्मचारी कार्यालयामध्ये राहणार आहेत. शुक्रवारपासून या आदेशाची अंमलबजावणी सुरु झाली. शुक्रवारी विद्यापीठाच्या ३९ अधिविभागांसह, मुख्य



प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, परीक्षा विभाग, दूरशिक्षण यासह सर्व विभागांमध्ये ५० टक्के अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या हजेरीचे व गैरहजेरीचे नियोजन विभागांच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यापीठातील रस्ते ओस

विद्यापीठातील सर्व अधिविभगांना शुक्रवार पासून सुटी देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांना घरी जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर शुक्रवारपासून विद्यापीठामध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांना रोटेशन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठातील रस्ते ओस पडल्याचे चित्र सर्वत्र दिसत होते.



कोल्हापूर : कुलसचिव डॉ. नांदवडेकर, प्रशिक्षक बाजीराव पाटील व अन्य मान्यवरांसोबत अक्षय मंगवडे.

# अक्षय मंगवडेचा सत्कार

पुनाळ : कोतोली येथील श्रीपतराव चौगुले आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेजचा विद्यार्थी अक्षय मंगवडेने कुस्तीत रौप्यपदक मिळवले. अक्षयने भुवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या खेलो इंडिया कुस्ती स्पर्धेत १२५ किलो वजनी गटात रौप्यपदक प्राप्त केले. तो बी.ए. भाग एकमध्ये शिकतो. शिवाजी विद्यापीठात कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिमखानाप्रमुख प्रा. यु. एन. लाड, वित्त व लेखाधिकारी पाटील, क्रीडा विभागप्रमुख डॉ. गायकवाड, कुस्ती प्रशिक्षक प्रा. बाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

# विद्यापीठात ५0 टक्के कर्मचारी उपस्थित

## अंमलबजावणी सुरु : सर्व अधिविभाग बंदच असल्याने शुकशुकाटात भर; रोटेशननुसार कामावर येण्याच्या सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय आणि अधिविभागांतील काम शुक्रवारपासून सुरु झाले. वर्ग भरत नसल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती नाही. त्यातच ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाल्याने विद्यापीठ परिसरातील शुकशुकाटामध्ये अधिकच भर पडली आहे.

कोरोनाबाबत दक्षता म्हणून राज्य सरकारने सर्व शासकीय कार्यालयांतील गर्दी कमी करण्यासाठी ५० टक्के कर्मचारी उपस्थित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी विद्यापीठात शुक्रवारपासून सुरु झाली.



**'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर ५0 टक्के कर्मचारी उपस्थितीच्या निर्णयाची शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे दूरशिक्षण केंद्राच्या कार्यालयात असा शुकशुकाट दिसून आला.**

विद्यापीठातील विविध अधिविभागांतील तातडीचे आणि महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चीफ रेक्टर, प्रशासकीय विभागप्रमुखांकडून सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना रोटेशननुसार कामावर येण्याच्या सूचना केल्या. अत्यावश्यक सेवेकडील एकत्रित मानधन, रोजंदारी कर्मचारी उपस्थित राहिले.

ज्यांना येणे शक्य नव्हते, त्यांनी त्याबाबत आपापल्या विभागप्रमुखांना कळविले. ५० टक्के उपस्थितीबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने गुरुवारी (दि. १९) सायंकाळी काढले.

त्यावर काही विभागप्रमुखांनी त्याची माहिती कर्मचाऱ्यांना व्हॉट्स ॲपद्वारे दिली. मात्र, ज्यांना माहिती मिळाली नाही, असे बहुतांशजण कामावर उपस्थित राहिले. त्यामुळे साधारणत: ७० टक्के कर्मचारी उपस्थित होते. आज, शनिवारपासून कर्मचारी उपस्थितीची संख्या आणखी कमी होईल.

दरम्यान, विद्यापीठ परिसर म्हणजे कायम वर्दळ असे चित्र प्रथमच कोरोनामुळे बदलल्याचे दिसत आहे.

### 'मार्च एंड'चा परिणाम

वित्त व लेखा विभागांसह विविध विभागांमध्ये मार्च एंडचे काम सध्या सुरु आहे. ते पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे कामाच्या गरजेनुसार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित विभागांच्या उपकुलसचिवांना आहेत. काम पूर्णत: ठप्प होणार नाही, याची दक्षता घेऊन उपकुलसचिव कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतची कार्यवाही करीत आहेत.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांची आकडेवारी दृष्टिक्षेपात

- वर्ग एक (उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव) : ३९
- वर्ग दोन (पर्यवेक्षक) : 30
- वर्ग तीन (वरिष्ठ आणि कनिष्ठ लिपिक) : २६५
- वर्ग चार (शिपाई) : १६५

# 'अण्णाभाऊ साठे यांना मानद डी. लीट पदवी द्या'

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने थोरसाहित्यिक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना प्रतिष्ठेची मानद डी. लीट ही पदवी देऊन त्यांचा सन्मान करावा, या मागणीचे निवेदन विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे (सिनेट) सदस्य अब्राहम आवळे यांनी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे, की कुठलाही शैक्षणिक वारसा नसतानाही अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य क्षेत्रात एकपेक्षा एक सरस अशा साहित्याची निर्मिती केली आहे. त्यांचे साहित्य गेल्या ३ दशकांपासून देशातील अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रम व शोधनिबंधाचा भाग बनत चालले आहे. अनेकांनी त्यांच्या साहित्यावर प्री.एचडी सुद्धा केल्या आहेत. अण्णाभाऊ यांनी निर्माण केलेल्या कादंबऱ्या, लघुकथा, पटकथा, प्रवास वर्णने, लावण्या यांचा वाचकांना आजही विसर पडलेला नाही. त्यांचे साहित्य समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी कर्नाटकात अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनाचे दरवर्षी आयोजन केले जाते. १ ऑगस्ट हा अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिवस आहे. तेव्हा विद्यापीठाने अण्णा भाऊंच्या साहित्याचा गांभिर्याने विचार करुन १ ऑगस्ट याचदिवशी मानद डि. लीट ही पदवी देऊन त्यांना सन्मानित करावा, असेही निवेदनात नमुद केले आहे. निवेदन देतेवेळी अनिल म्हमाणे, डॉ. आर. जी. कोरबू उपस्थित होते.



**कोल्हापूर : मागणीचे निवेदन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना देताना सिनेट सदस्य अब्राहम आवळे. शेजारी अनिल म्हमाणे व डॉ. आर. जी. कोरबू**

पुढारी




कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सात वर्षे मानसिक, सामाजिक आणि न्यायालयीन पातळींवर कडवी झुंज दिल्यानंतर शुक्रवारी दिल्लीतील निर्भयाला न्याय मिळला. १६ डिसेंबर २०१२ रोजी घडलेल्या घटनेने संपूर्ण देश हादरून गेला होता. बलात्कार पीडित निर्भयाला न्याय मिळावा, म्हणून अखंड देश रस्त्यावर उतरला; पण तत्काळ काहीच झाले नाही. आज तब्बल सात वर्षांनी निर्भयाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असला तरी देशात अशा अनेक निर्भया आजही न्यायाच्या प्रतीक्षेत तिष्ठत आहेत. त्या सर्व निर्भयांना लवकरात लवकर न्याय मिळाला तर बलात्काऱ्यांच्या वासनेला कायमची खीळ बसेल. निर्भया प्रकरणातील चौघा दोषींना आज फासांवर लटकवण्यात आले. यानंतर विविध क्षेत्रांतील महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

(आणखी प्रतिक्रिया पान दोनवर)

"

निर्भयाला न्याय मिळाला, ही जमेची बाजू असली तरी तिला जीव गमवावा लागला, तिच्या कुटुंबीयांना न्यायासाठी एक दीर्घ लढा लढावा लागला आहे. दोषींना लवकरात लवकर शासन देण्यासाठी न्यायव्यवस्थेची फेररचना करणे गरजेचे आहे, असेही वाटते. वासनेसाठी देशात आज अशा असंख्य निर्भया मारल्या जात आहेत.

**मेघा पानसरे,** सामाजिक कार्यकर्त्या

"

प्रत्येक महिला या क्षणाची मागील सात वर्षांपासून वाट पाहत होती. निर्भयाच्या कुटुंबाला न्यायासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागली; मात्र अखेर न्याय मिळाला. या निर्णयाचे स्वागतच; पण देशातील मुलींसाठी हा लढा असाच सुरू राहील

\- **प्रणाली पवार,**

विद्यार्थिनी, मास कम्युनिकेशन, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठाचे शुल्क ऑनलाइन भरा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोना विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील विविध शुल्क भरण्यासाठी ऑनलाइन किंवा पेमेंट गेटवे यंत्रणेचा वापर करावा, अशी सूचना प्रशासनाने केली आहे.

राज्यातील शाळा, महाविद्यालय, विद्यापीठांना सुटी आहे. दरम्यान नियोजित परीक्षादेखील ३१ मार्चपर्यंत लांबणीवर टाकले आहेत. विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया सुरू होती ते ऑनलाइन शुल्क भरावे, अशी सूचना विद्यापीठाने केली आहे. ऑनलाइन शुल्क भरण्यासाठी विद्यापीठान युको बँक विद्यानगर, बँक ऑफ महाराष्ट्र ताराबाई पार्क, बँक ऑफ इंडिया लक्ष्मीपुरी, स्टेट बँक ऑफ इंडिया दसरा चौक, आयडीबीआय बँक, शिवाजी चौक येथे सुविधा दिली आहे.

- युको बँक, विद्यानगर: आयएफएससी कोड UCBA 0000289
- बँक ऑफ महाराष्ट्र: आयएसएससी कोड MAHB0001045
- बँक ऑफ इंडिया : आयएफएससी कोड BKID0000900
- स्टेट बँक ऑफ इंडिया : आयएफएससी कोड SBIN0000413
- आयडीबीआय बँक: आयएफएससी कोड IBKL0000463

# विद्यापीठात ५० टक्केच उपस्थिती

कोल्हापूर : करोना विषाणू संसर्ग प्रतिबंधात्मक खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील विभागातील एकूण अधिकारी, कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहणार आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्ध केले आहे. करोना विषाणू प्रसारावर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून आदेश काढण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने आज परिपत्रक काढले.

सर्व अधिकारी, कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलावता त्यांना रोटेशनुसार कार्यालयात बोलवावे. ५० टक्के उपस्थिती राहील, याची दक्षता घ्यावी. याबाबतचा अहवाल आस्थापना विभागास ३१ मार्चनंतर सादर करण्यात यावा. कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळालेल्या अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांची प्रलंबित कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत, अशा सूचना कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी परिपत्रकात दिल्या आहेत.

## सेवक संघास मास्क वाटप

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या सभासदांना अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने (पेठवडगाव) मास्क आणि सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले.

# कामकाज ऑनलाइन

कोल्हापूर : करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने ऑनलाइन कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Exam या लिंकवर सर्व प्रकारचे अर्ज डाऊनलोड करून घेता येणार आहेत. या अर्जांमधील माहिती भरून अर्ज स्कॅन करून वेबसाइटवरील मेलवर पाठवावा लागणार आहे. संबंधित अर्जांचे शुल्क डीडीद्वारे विद्यार्थ्यांना भरावे लागेल.